महाराष्ट्र शासन
गृह विभाग
**मुंबई पोलीस**

**पोलीस उप आयुक्त, वाहतूक (पश्चिम उपनगरे), मुंबई यांचे कार्यालय**

सशस्त्र पोलीस प्रशिक्षण, क्रिडा व कल्याण इमारत, पहिला मजला, १/७, कलिना, सांताक्रुझ चेंबूर लिंक रोड, कलिना युनिव्हर्सिटी समोर, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई – ९८. Email – dcpsub.traffic@mahapolice.gov.in

जा.क्र.७७०८/पोउपआ/वाहतूक/पश्चिम उपनगरे/ता. अधिसूचना/२०२६, दिनांक – ०८/०७/२०२६

## तात्पुरती अधिसूचना / आदेश

अधिसूचना क्रमांक -७६३ /पोउपआ/वाहतूक/पश्चिम उपनगरे/ता. अधिसूचना/२०२६, दिनांक – ०८/०७/२०२६

**ज्या अर्थी,** समता नगर वाहतूक विभागाच्या कार्यक्षेत्रातील समता नगर पोलीस ठाणे हद्दीमधील लोखंडवाला, दुर्गा नगर ते कुरार पोलीस ठाणे हद्दीमधील हिंदू स्मशानभूमी हा मार्ग अरुंद असून वाहतुकीच्या दृष्टीने दिवसभर वर्दळीचा आहे. सदर मार्गावर सकाळी व सायंकाळी गर्दीच्या कालावधीत लोखंडवाला संकुलाकडून कुरार गावाकडे तसेच कुरार गावाकडून लोखंडवाला संकुलाकडे मोठ्या प्रमाणात वाहनांची ये-जा होत असते. तसेच दुपारच्या कालावधीत शालेय बसची वाहतूकही मोठ्या प्रमाणात असते. या कालावधीत सदर मार्गावर अवजड वाहनांची वाहतूक होत असल्यामुळे वारंवार वाहतूक कोंडी निर्माण होऊन वाहतुकीच्या सुरळीत प्रवाहास अडथळा निर्माण होत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे सदर मार्गावरील वाहतूक सुरक्षित व सुरळीत ठेवण्यासाठी लोखंडवाला, दुर्गा नगर ते हिंदू स्मशानभूमी या मार्गावर अवजड वाहनांच्या प्रवेशावर निर्बंध लागू करणे आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी, अजित बोऱ्हाडे, पोलीस उपायुक्त, वाहतूक (पश्चिम उपनगरे), मुंबई, मोटार वाहन अधिनियम, १९८८ चे कलम ११५ तसेच केंद्रीय मोटार वाहन नियम, १९८९ मधील नियम ५९ अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून तसेच शासन निर्णय क्रमांक एमव्हीए-०५८९/प्र.क्र.१०६१/टीआर-२, दिनांक १९/०५/१९८९, एम.जी.जी. भाग ४-अ, दिनांक २०/०९/१९९० व शासन निर्णय क्रमांक एमव्हीए-००१९६/८७१/प्र.क्र.३७/सीआर-२, दिनांक २७/०९/१९९६, एम.जी.जी. भाग १-व्ही-अ (असाधारण) क्रमांक ३०७ अन्वये अधिसूचना निर्गमित दिनांकापासून पुढील ३ महिन्यांसाठी प्रायोगिक तत्वावर खालीलप्रमाणे तात्पुरती वाहतूक व्यवस्था लागू करीत आहे.

**आदेश**

समता नगर वाहतूक विभागाच्या कार्यक्षेत्रातील समता नगर पोलीस ठाणे हद्दीमधील **लोखंडवाला, दुर्गा नगर ते कुरार पोलीस ठाणे हद्दीमधील हिंदू स्मशानभूमी या मार्गावर सकाळी ०८.०० वाजेपासून रात्री २१.०० वाजेपर्यंत सर्व प्रकारच्या अवजड मालवाहू वाहनांना प्रवेश व वाहतूक करण्यास बंदी राहील.**

Scanned with OKEN Scanner

सदर व्यवस्था प्रायोगिक तत्त्वावर अधिसूचना निर्गमित दिनांकापासून पुढील तीन महिन्यांच्या कालावधीसाठी लागू राहील. या कालावधीत वाहतूक परिस्थितीचा आढावा घेऊन आवश्यकतेनुसार पुढील निर्णय घेण्यात येईल.

ही अधिसूचना पोलीस, अग्निशमन दल, रुग्णवाहिका तसेच इतर अत्यावश्यक सेवेतील वाहने, दूध, भाजीपाला, फळे, ब्रेड, बेकरी उत्पादने, पेट्रोल, डिझेल, एलपीजी व इतर जीवनावश्यक वस्तूंची वाहतूक करणाऱ्या वाहनांना लागू राहणार नाही.

सदर अधिसूचनेचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांविरुद्ध मोटार वाहन अधिनियम, १९८८ तसेच इतर लागू असलेल्या कायद्यांनुसार योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

ही अधिसूचना माझ्या शिक्क्यासह व स्वाक्षरीसह दि. ०८/०७/२०२६ रोजी मुंबई येथे जारी करण्यात येत आहे.

पोलीस उप आयुक्त वाहतूक, ★ पश्चिम उपनगरे, मुंबई ★

**(अजित बोऱ्हाडे)**
पोलीस उप आयुक्त, वाहतूक (पश्चिम उपनगरे)
मुंबई शहर

Scanned with OKEN Scanner

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
गृह विभाग
मुंबई पोलीस

**Office of the Deputy Commissioner of Police, Traffic (Western Suburbs)**

Armed Police Training, Sports & Welfare Building, 1st Floor, 1/7 Kalina, Santacruz-Chembur Link Road, Opposite Kalina University Santacruz (East), Mumbai – 400 098 Email – dcpsub.traffic@mahapolice.gov.in

## TEMPORARY NOTIFICATION / ORDER

**Notification No. 163 /DCP/Traffic/Western Suburbs/Temp. Notification/2026, Dated: 08/07/2026**

**WHEREAS,** the road stretch from Lokhandwala, Durga Nagar under the jurisdiction of Samata Nagar Police Station to the Hindu Crematorium under the jurisdiction of Kurar Police Station, falling within the jurisdiction of Samata Nagar Traffic Division, is narrow and experiences heavy vehicular traffic throughout the day. During the morning and evening peak hours, a substantial volume of traffic moves from Lokhandwala Complex towards Kurar Village and vice versa. In addition, a large number of school buses ply on this route during the afternoon hours. The movement of heavy goods vehicles during these periods frequently results in traffic congestion and obstructs the smooth flow of vehicular traffic. Therefore, it has become necessary to impose restrictions on the entry of heavy goods vehicles on the road stretch from Lokhandwala, Durga Nagar to the Hindu Crematorium in order to ensure safe and smooth movement of traffic.

**NOW, THEREFORE,** I, Ajit Borhade, Deputy Commissioner of Police, Traffic (Western Suburbs), Mumbai, in exercise of the powers conferred upon me under Section 115 of the Motor Vehicles Act, 1988, read with Rule 59 of the Central Motor Vehicles Rules, 1989, and in accordance with Government Resolution No. MVA-0589/CR-1061/TR-2 dated 19/05/1989, published in M.G.G. Part IV-A dated 20/09/1990, and Government Resolution No. MVA-00196/871/CR-37/CR-2 dated 27/09/1996, published in M.G.G. Part I-V-A (Extraordinary), No. 307, hereby impose the following temporary traffic regulation on an experimental basis for a period of three (3) months from the date of issuance of this notification.

## ORDER

On the road stretch from Lokhandwala, Durga Nagar under the jurisdiction of Samata Nagar Police Station to the Hindu Crematorium under the jurisdiction of Kurar Police Station, falling within the jurisdiction of Samata Nagar Traffic Division, **all heavy goods vehicles shall be prohibited from entering and plying between 08:00 hrs and 21:00 hrs every day.**

The above traffic regulation shall remain in force on an experimental basis for a period of three (3) months from the date of issuance of this notification. During this period, the prevailing traffic conditions shall be reviewed, and further decisions shall be taken as may be considered necessary.

This notification shall not apply to vehicles belonging to the Police Department, Fire Brigade, Ambulance Services, and other Essential Services, including vehicles

Scanned with OKEN Scanner

transporting milk, vegetables, fruits, bread, bakery products, petrol, diesel, LPG, and other essential commodities.

Any person violating the provisions of this notification shall be liable for appropriate legal action under the Motor Vehicles Act, 1988, and other applicable laws in force.

This notification is issued under my hand and seal at Mumbai on this 8th day of July, 2026.

**(Ajit Borhade)**
DCP Traffic (Western Suburbs)
Mumbai City

Scanned with OKEN Scanner

महाराष्ट्र शासन

गृह विभाग

**मुंबई पोलीस**

**पोलीस उप आयुक्त, वाहतूक (पश्चिम उपनगरे), मुंबई यांचे कार्यालय**

सशस्त्र पोलीस प्रशिक्षण, क्रिडा व कल्याण इमारत, पहिला मजला, १/७, कलिना, सांताक्रुझ चेंबूर लिंक रोड, कलिना युनिव्हर्सिटी समोर, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई – ९८. Email – dcpsub.traffic@mahapolice.gov.in

जा.क्र३१७८/पोउपआ/वाहतूक/पश्चिम उपनगरे/ता. अधिसूचना/२०२६, दिनांक – ०८/०७/२०२६

## :: वार्तापत्र ::

समता नगर वाहतूक विभागाच्या कार्यक्षेत्रातील **समता नगर पोलीस ठाणे हद्दीमधील लोखंडवाला, दुर्गा नगर ते कुरार पोलीस ठाणे हद्दीमधील हिंदू स्मशानभूमी** या मार्गाची रुंदी कमी असून सदर मार्गावर दिवसभर मोठ्या प्रमाणात वाहतूक असते. सकाळी व सायंकाळी गर्दीच्या वेळेत तसेच दुपारच्या कालावधीत शालेय बसची वाहतूक मोठ्या प्रमाणात होत असल्याने अवजड मालवाहू वाहनांमुळे वारंवार वाहतूक कोंडी निर्माण होते. सदर मार्गावरील वाहतूक सुरक्षित व सुरळीत ठेवण्याच्या उद्देशाने **पुढील तीन महिन्यांसाठी प्रायोगिक तत्त्वावर** सकाळी **०८.०० वाजेपासून रात्री २१.०० वाजेपर्यंत** सर्व प्रकारच्या अवजड मालवाहू वाहनांना प्रवेश व वाहतुकीसाठी मनाई करण्यात येत आहे.

ही अधिसूचना पोलीस, अग्निशमन दल, रुग्णवाहिका तसेच इतर अत्यावश्यक सेवेतील वाहने, दूध, भाजीपाला, फळे, ब्रेड, बेकरी उत्पादने, पेट्रोल, डिझेल, एलपीजी व इतर जीवनावश्यक वस्तूंची वाहतूक करणाऱ्या वाहनांना लागू राहणार नाही.

सर्व वाहनचालकांनी वाहतूक पोलिसांनी दिलेल्या सूचनांचे पालन करून सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

**(अजित बोऱ्हाडे)**

पोलीस उप आयुक्त, वाहतूक (पश्चिम उपनगरे)

मुंबई शहर

पोलीस उप आयुक्त वाहतूक, पश्चिम उपनगरे, मुंबई

Scanned with OKEN Scanner

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
गृह विभाग
मुंबई पोलीस


**Office of the Deputy Commissioner of Police, Traffic (Western Suburbs)**

Armed Police Training, Sports & Welfare Building, 1st Floor, 1/7 Kalina, Santacruz-Chembur Link Road, Opposite Kalina University Santacruz (East), Mumbai – 400 098 Email – dcpsub.traffic@mahapolice.gov.in


**Outward No. 100 /DCP/Traffic/Western Suburbs/Temp. Notification/2026, Dated: 08/07/2026**

## :: PRESS NOTE ::

The **road stretch from Lokhandwala, Durga Nagar under the jurisdiction of Samata Nagar Police Station to the Hindu Crematorium under the jurisdiction of Kurar Police Station,** falling within the jurisdiction of Samata Nagar Traffic Division, is narrow and carries heavy traffic throughout the day. During the morning and evening peak hours, as well as during the afternoon when a large number of school buses ply on the route, the movement of heavy goods vehicles frequently results in traffic congestion. Therefore, with a view to ensuring safe and smooth movement of traffic, **the entry and movement of all heavy goods vehicles on the said road shall be prohibited from 08:00 hrs to 21:00 hrs every day on an experimental basis for a period of three (3) months.**

This notification shall not apply to vehicles belonging to the Police Department, Fire Brigade, Ambulance Services and other Essential Services, including vehicles transporting milk, vegetables, fruits, bread, bakery products, petrol, diesel, LPG and other essential commodities.

All motorists are requested to cooperate with the Mumbai Traffic Police by complying with the above traffic regulation and by following the directions issued by the Traffic Police.

DEPUTY COMMISSIONER OF POLICE, TRAFFIC, WESTERN SUBURBAN, MUMBAI

**(Ajit Borhade)**
DCP Traffic (Western Suburbs)
Mumbai City

Scanned with OKEN Scanner